# सुस्वागतम

# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना (PM KISAN)

# शासन निर्णय

- **महाराष्ट्र शासन यांचेकडील परिपत्रक क्रं.किसयो-2019/प्र.क्रं.20/11 अे दिनांक 4 फेब्रवारी 2019**
- **महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्रं. किसयो -019/प्र.क्रं.20/11अे दि.09/02/2019**
- कृषी आयुक्तालय महाराष्ट्र राज्य यांचेकडील जा.क्रं.कृ.गणना/पीएमकिसान/366/2019दि.13/6/2019

# योजनेचा लाभ

- शेतक-यांना निश्चित उत्पन्न
- प्रती शेतकरी कुटुंबाला प्रति वर्ष रू. 6000/- इतके आर्थिक सहाय्य.
- कमाल जमिन धारणा क्षेत्राची अट रद्द

# अपात्रता निकष

- 1. जमीन धारण करणारी संस्था
- 2. घटनात्मक पद धारण करणारी आजी माजी व्यक्ती
- 3. आजी माजी (मंत्री, खासदार, आमदार, महापौर, जिप अध्यक्ष)
- 4. कार्यरत व निवृत्त कर्मचारी (केंद्र व राज्य शासन, शासन अंगीकृत निमशासकीय संस्था, स्वायत्त संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था) गट ड सह वगळून
- 5. मागील वर्षात आयकर भरलेल्या व्यक्ती
- 6. 10 हजार किंवा जास्त निवृत्तिवेतन असलेल्या व्यक्ती
- 7. नोंदणीकृत डॉक्टर, वकील, अभियंता, सनदी लेखापाल, वास्तुशास्त्रज्ञ इ.

# जिल्हास्तरीय समिती

- जिल्हाधिकारी – अध्यक्ष
- मुख्य कार्यकारी अधिकारी – सदस्य
- जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी – सदस्य
- ड ीस्ट्रीक्ट डोमेन एक्सपर्ट (DILRMP) – सदस्य
- निवासी उपजिल्हाधिकारी – समन्वय अधिकारी तथा **जिल्हास्तरीय** नोडल अधिकारी
- जिल्हा उपनिबंधक सहकारी स ंस्था - सदस्य
- जिल्हा अग्रणी बँक अधिकारी - सदस्य

# जिल्हास्तरीय समितीची कार्ये व जबाबदारी

- या योजनेस व्यापक प्रसिध्दी देणे.
- तालुकास्तरीय व क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे.
- निश्चित करून देणेत आलेल्या कालबध्द कार्यक्रमानुसार माहिती संकलनाचा दैनंदिन आढावा घेणे.
- क्षेत्रिय स्तरावरील प्राप्त होणा-या तक्रारींचे निराकरण करणे.
- सदर योजनेशी संबधित सर्व विभागामध्ये समन्वय घडवून आणणे.
- जिल्हाधिकारी या मोहिमेचे प्रमुख म्हणून काम पहातील तसेच निवासी उपजिल्हाधिकारी हे मोहिमेचे नोडल अधिकारी असतील.

# तालुकास्तरीय समिती

- उपविभागीय अधिकारी – अध्यक्ष
- उपविभागीय कृषी अधिकारी- सदस्य
- तहसिलदार - समन्वय अधिकारी तथा तालुकास्तरीय नोडल अधिकारी
- गट विकास अधिकारी - सदस्य
- तालुका कृषी अधिकारी - सदस्य
- सहाययक निबंधक सहकारी सहकारी संस्था - सदस्य

## तालुकास्तरीय समितीची कार्ये व जबाबदारी –

- ग्रामस्तरावरून प्राप्त झालेल्या तक्रारीचे निराकरण करणे. त्याअनुषगांने तालुकास्तरीय समिती ही तक्रार निवारण समिती म्हणून काम करेल.
- तालुकास्तरीय समिती ही तालुकास्तरीय विविध विभागामध्ये या योजनेच्या कार्यान्वयाच्या  दृष्टीने समन्वय साधणे.
- सर्व ग्रामसमित्या कालबध्द कार्यक्रमानुसार कामकाज करित असल्याबाबतचा दैनंदिन आढावा  घेणे.
- तालुकास्तरीय समितीसाठी तहसिलदार हे योजनेसाठी प्रमुख जबाबदार राहतील.

# ग्रामस्तरीय समिती

- तलाठी – समिती प्रमुख
- ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकारी –सदस्य
- कृषी सहाय्यक – सदस्य
- सचिव वि.का.से.स.सो. – सदस्य

# ग्रामस्तरीय समितीची कार्ये व जबाबदारी

- शेतकरी कुटुंबाची निश्चिती करणे आणि याकरिता राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम व कृषी गणना यांची माहिती प्राप्त करून परिशिष्ट अ मध्ये दिलेल्या नमुन्यामध्ये नोंद करणे .
- सदर योजनेचे गावात व्यापक प्रसिध्दी करून मोहिम स्वरूपात गावातील शेतक-यांचे बँक खाते क्रमांक, आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक ही माहिती प्राप्त करून परिशिष्ट अ मध्ये भरणे.
- ग्रामपातळीवर ही माहिती संकलित करण्याची प्रमुख जबाबदारी तलाठी यांची असून ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक हे वरील वरील कामासाठी पूर्ण सहकार्य करतील.

# योजनची कार्यपध्दती

- प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचे कामकाज करताना तलाठी यांनी यादीमध्ये त्या गावातील खातेदारांचे कुटूंबनिहाय वर्गीकरण करावे.(कुटूंब म्हणजे – पती-पत्नी वत्यांची18 वर्षाखालील मुले)
- कुटूंबनिहाय वर्गीकरण करताना ज्या कुटूंबाचे एकुण क्षेत्र 2 हे.पेक्षा जास्त आहे, अशा कुटुंबाची स्वतंत्र यादी परिशिष्ट ब मध्ये तयार करावी.
- ज्या शेतकरी खातेदारांचे सामाईक खाते असेल व खात्यामध्ये आणेवारी किंवाक्षेत्र निश्चिती झालेली नसेल अशा बाबतीत सदर खात्यामधील ज्याव्यक्तीचीमाहिती परिशिष्ट अ मध्ये नमूद केली असेल त्या खातेदाराचे परिशिष्ट – क मध्ये स्वयंघोषणापत्र घेण्यात यावे.
- संकलित केलेली माहिती ग्रामपातळीवर प्रसिध्द करण्यात यावी वतयावरहरकती/आक्षेप प्राप्त झालेस त्यावर ग्रामस्तरीय समितीने योग्य निर्णय घ्यावा.
- ग्रामस्तरीय समितीने दिलेला निर्णय मान्य नसल्यास,तालुकास्तरीय समितीकडे दाद मागता येईल.तयार केलेल्या यादयांचेगावामध्ये वाचन करून तसे इतिवृत्त तयार करावे.

- परिशिष्ट अ मधील पात्र ठरलेल्या कुटूंबाची अंतिम यादी तयार करून त्याची Hard Copy  ग्रामस्तरीय समितीच्या सर्व सदस्यांनी स्वाक्षांकित करावी.तसेच Excel File soft copy (Unicode मध्ये) तहसिल कार्यालयात जमा करावी.
- संबधित तहसिलस्तरावर प्राप्त गाव निहाय यादीचे तहसिलदार, गटविकासअधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांनी गावांचे वाटप करून यादृच्छिक पध्दतीने (randomly)प्राप्त यादीची 2% तपासणी करावी व पात्रतेबाबतखात्रीकरावी याशिवाय संबंधितउप-विभागीय अधिकारी(प्रांत-अधिकारी)व उप विभागीय कृषी अधिकारी यांनी 1 % यादीची तपासणी करून पात्रतेबाबत खात्री करावी.

- परिशिष्ट अ - पात्र शेतकरी कुटूंबाची माहिती
- परिशिष्ट ब - अपात्र शेतकरी कुटूंबाची माहिती
- परिशिष्ट क – सामाईक खातेदारापैकी एका खातेदारांकडून घ्यावयाचे स्वंयघोषणा पत्र
- परिशिष्ठ ड – पात्र शेतकरी याने दयावयाचे घोषणापत्र

# अंमलबजावणी करताना घ्यावयाची काळजी

- पात्र लाभार्थ्यांची माहिती एकत्रित करताना परिशिष्ट “अ” मधील ओळखपत्राचा प्रकार म्हणून आधारकार्ड नमूद करावे. आधारकार्ड उपलब्ध नसल्यास आधार कार्ड नोंदणी क्रमांक नमूद करावा.इतर कोणताही ओळखपत्राचा प्रकार नमूद करू नये. जी माहिती त्रुटीपूर्ततेकरीता परत आली आहे.त्यामध्ये सुध्दा इतर ओळखपत्राऐवजी आधार क्रमांक नमूद करावा.
- पात्र खातेदार शेतक-यांचे 8- अ खातेपुस्तकांवर नमूद केलेले गाव व बँक खात्यावरील नाव एकच असल्याची खात्री करावी.
- बँक खातेच्या पासबुकावरील पहिल्या पृष्ठाची छायांकित प्रत घेण्यात यावी जेणेकरून त्या पृष्ठावरील नमूद शेतक-यांचे नाव, बँकेचे नाव,शाखा,खाते क्रमांक व IFSE Code आणि आधार कार्डावरील तपशील याची पडताळणी करून अचूकपणे संकेतस्थळावर माहिती नोंदविणे शक्य होईल.
- संकेतस्थळावर माहिती अपलोड करण्यापूर्वी शेतक-यांची आधार कार्डावरील नावे, आधार क्रमांक , बँक खाते क्रमांक व IFSE Code इत्यादी महत्त्वपूर्ण माहितीची अचूक पडताळणी करण्यात यावी. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी ही ग्रामस्तरावरील संबंधित अधिकारी/ कर्मचा-यांची असेल.

- माहिती अपलोड करताना जिल्हा कोड, उपजिल्हा कोड, तालुका कोड व गाव कोड अचूकपणे भरला असल्याबाबतची खात्री करावी.
- परिशिष्ठ “अ” (सुधारित) मधील अनिवार्य माहिती(Mandatory Field) दि.09/02/2019 रोजी निर्गमित केलेल्या पत्रातील सुचनांनुसार काटेकोरपणे भरण्यात यावी.
- या योजनेचा दुसरा हप्ता देण्याकरिता पात्र खातेदार शेतक-यांकडे आधार कार्ड व आधार संलग्नित बँक खाते असणे अनिवार्य असून यापूर्वी पात्र असलेले लाभार्थी तसेच नव्याने भरण्यात येणा-या लाभार्थ्यांचे आधार कार्ड अत्यावश्यक असेल.तसेच अन्य काणेतेही ओळखपत्र ग्राह्य धरले जाणार नाही.
- ज्या शेतक-यांची माहिती विविध कारणांमुळे त्रुटीपूर्ततांकरीता जिल्हा किंवा तालुका लॉगईन वर परत आलेली आहे.सदर माहिती दुरूस्त करून तात्काळ पोर्टलवर अपलोड करावी.
- या योजनेंतर्गत लाभ मिळालेल्या सर्व शेतक-यांची यादी (शेतक-यांचे बँक खाते क्रमांक व आधार क्रमांक वगळून)संबधित ग्रामपंचायत स्तरावर प्रदर्शित काण्यात यावी.
- प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM-KISAN) योजनेची उपरोक्त बाबींसह प्रसारमाध्यांमाव्दारे व्यापक प्रचार व प्रसिध्दी करण्यात यावी.तसेच विशेष मोहिम घेवून सर्व पात्र शेतक-यांची माहिती संकेतस्थळावर अपलोड करावी.

# सर्वसाधारणपणे आढळणा-या त्रुटी

- सदर माहिती भरताना शेतक-यांचे जे आधार नंबर टाकले जातात ते डयुप्लीकेट असल्याचे दिसून आले आहे. तरी सदर आधारनंबरची खात्री करूनच नंबर टाकले जावेत.
- सदर माहिती कामी आधार नंबर किंवा आधार enrolled number वापरले जावेत.
- आधारऐवजी ID Card घेवू नयेत.
- आधार नंबर टाकताना तो 12 अंकी टाकला जात नाही तो जास्त किंवा कमी अंकी टाकला जातो व आधार enrolled number हा 14 अंकी असताना तो कमी टाकला जातो. तरी याबाबत खातरजमा करून नंबर टाकले जावेत.
- Invalid Data download केला गेला आहे तरी सदर बाबतची त्रुटीपूर्तता करून Data download करावा.
- ब-याच शेतकरी खातेदारांचे अकॉउंट नंबर टाकले गेले नाहीत.
- Bank Data upload करताना तो Duplicate टाकले गेलेले आहेत.म्हणजे एकावेळी 2 बॅंकाची नावे टाकली गेलेली आहेत.
- Village Code /District Code चुकीचे टाकले गेलेले आहेत.
- IFSE Code चुकीचे टाकले गेलेले आहेत.
- Gender (Male/Famale) चुकीचे टाकले गेलेले आहेत.

## परिशिष्ट - क.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM-KISAN) योजनेकरीता सामाईक खातेदारापैकी एका खातेदाराकडून घ्यावयाचे घोषणापत्र.

मी, श्री/श्रीमती........................., राहणार :- ............., वय -........, व्यवसाय........ असे घोषित करतो की, मी.................................. गावाचा शेतकरी खातेदार असून माझा सामाईक खाते क्रमांक..................... असून एकुण क्षेत्र ......... आहे. सदर खात्यामध्ये ...... इतके सहखातेदार असून त्यांच्यापैकी मी श्री./ श्रीमती.......................................... प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM-KISAN) योजने अंतर्गत मिळणाऱ्या लाभाकरिता बँकेचे खाते क्रमांक......................., आधार क्रमांक..............मोबाईल क्रमांक.................. जोडणेस देत आहे. सदर सहखातेदारापैकी कोणीही भविष्यात हयाबाबत तक्रार किंवा हरकत उपस्थित केल्यास सर्वस्वी जबाबदारी माझी राहील.

स्थळ :-

दिनांक (सही)

| Sr No. | तालुका | एकूण संभाव्य पात्र खातेदार | नोंदणी झालेले खातेदार | नोंदणी शिल्लक खातेदार | नोंदणी झालेल्या पैकी त्रुटीयुक्त खातेदार संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | करवीर | 156481 | 43977 | 112504 | 34312 |
| 2 | गगनबावडा | 11562 | 4331 | 7231 | 2719 |
| 3 | पन्हाळा | 73535 | 37636 | 35899 | 26938 |
| 4 | शाहुवाडी | 59784 | 13426 | 46358 | 11128 |
| 5 | हातकणंगले | 136184 | 33538 | 102646 | 22767 |
| 6 | शिरोळ | 75955 | 33916 | 42039 | 23715 |
| 7 | राधानगरी | 65606 | 33577 | 32029 | 14305 |
| 8 | कागल | 86929 | 32799 | 54130 | 15214 |
| 9 | भुदरगड | 56359 | 17266 | 39093 | 16099 |
| 10 | आजरा | 32636 | 15966 | 16670 | 8172 |
| 11 | गडहिंग्लज | 64849 | 31282 | 33567 | 10382 |
| 12 | चंदगड | 64129 | 31378 | 32751 | 26248 |
| Total | | 884009 | 329092 | 554917 | 211999 |

| PM-KISAN email id | | |
|---|---|---|
| Sr.No | Taluka | Email |
| 1 | Kagal | pmkisan.kagal@gmail.com |
| 2 | Radhanagari | pmkisan.radhanagari@gmail.com |
| 3 | Ajar | pmkisan.ajara@gmail.com |
| 4 | Bhudargad | pmkisan.bhudargad@gmail.com |
| 5 | Gadhinglaj | pmkisan.gadhinglaj@gmail.com |
| 6 | Chandgad | pmkisan.chandgad@gmail.com |
| 7 | Panhala | pmkisan.panhala@gmail.com |
| 8 | Shahuwadi | pmkisan.shahuwadi@gmail.com |
| 9 | Gaganbawda | pmkisan.gaganbawda@gmail.com |
| 10 | Karvir | pmkisan.karvir@gmail.com |
| 11 | Hatkanangale | pmkisan.hatkanangale@gmail.com |
| 12 | Shirol | pmkisan.shirol@gmail.com |

| State_Ref_Number | State Code | District Code | Sub_District_Code | Block Code | Village Code | Farmer_Name | Gender (M/F/T) | Farmer_Category (1-SC/ 2-ST/ 5-Other) | Identity_Proof_Type [1 for Aadhar (only)] | Identity_Proof_No [Aadhar No.] | IFSC_Code [9 Character] | Bank_Account_No. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |

| MobileNo | DOB [yyyy/mm/dd] | Father_Mother_Husband_Name | HomeAddress | Ownership_Single_Joint [1-Single/ 2-Joint] | Sr_No | Survey_Khata_No | Khasra_Drag_No | Area | FarmerType [1-below 2 ha/ 2-above 2 ha] |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |

1)State_Ref_Number (Must be blank)
2)StateCode
3)DistrictCode
4)Sub_District_Code
5)BlockCode
6)VillageCode
7)Farmer_Name
8)Gender (M/F/T)
9)Farmer_Category
10)Identity_Proof_Type
11)Identity_Proof_No
12)IFSC_Code
13)Bank_Account_Number
23)FarmerType ( 1 for area upto 2 Hectare and for are above 2 Hectare)

ही माहिती अत्यंत काळजी पुर्वक भरावी चुकीची भरल्यास सदर शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा होणार नाहीत.

Thank you